**नियमावली क्र. 02**

## संस्थेच्या कामकाजाची माहिती

हया संस्थेत 4+1 कालावधीच्या बी.डी.एस. दंत अभ्यासक्रमास दरवर्षी 60 विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. सदर प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची एमएच-सीईटी परिक्षा किंवा ऑल इंडिया एन्टंरन्स परिक्षा दयावी लागते. हया महाविद्यालयात वेगवेगळया आठ विषयांत 3 वर्षाच्या कालावधीच्या एम.डी.एस. हया पदव्युत्तर अभ्यासक्रमास देखील दरवर्षी प्रवेश देण्यात येतो. सदर प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ किंवा ऑल इंडिया एन्टंरन्स परिक्षा दयावी लागते. महाराष्ट्र शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे सदर अभ्यासक्रमाचे शुल्क घेण्यात येते.

या महाविद्यालयात भारतीय दंत परिषदेच्या निकषांनुसार अध्यापकिय आणि परिचारिका वगैरे प्रवर्गात पूर्ण कर्मचारी वर्ग असून पदवी पूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व शैक्षणिक आवश्यकतांची पूर्तता केलेली आहे.

बाहयरुग्ण विभाग (ओ.पी.डी)/चिकित्सालये/महाविद्यालय यांची कामाची वेळ.

| कामाच्या दिवशी | सोमवार ते शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|
| केस पेपर मिळण्याची वेळ | सकाळी 8.30 ते दुपारी 3.30 | सकाळी 8.30 ते दुपारी 11.30 |
| चिकित्सालयांची वेळ | सकाळी 9.00 ते दुपारी 4.00 | सकाळी 9.00 ते दुपारी 12.00 |

**<u>मुख औषधशास्त्र रोग निदान व क्ष-किरण विभाग</u>**

कार्यकक्षा -

- नविन येणा-या सर्व बाहय रुग्णांची वैद्यकिय तपासणी करुन त्यांच्या आरोग्यविषयक तक्रारी तसेच आंतरबाहय मौखिक तपासण्यांची नोंद प्रत्येक रुग्णांच्या केसपेपरवर घेण्यात येते.
- रुग्णांच्या मुख्य तक्रारीची येथे वेळीच दखल घेतली जाते.
- क्ष-किरण चाचण्या घेऊन क्ष-किरण फिल्म वरुन रुग्णांच्या दंत रोगांचे निदान करुन त्यांना पुढील तपासण्याकरिता योग्य त्या दंत विभागात पाठविण्यात येते.

**<u>मुखशल्यशास्त्र व दांत काढयाचा विभाग</u>**

कार्यकक्षा -

- या विभागात दातापूरती भूल देऊन दांत काढले जातात.
- काढण्यास कठीण असलेले दात व इंप्याकशन व दंत व्यंगोपचार विभागातील उपचारासाठी आवश्यक असलेले दांत काढणे ही कामे केली जातात.
- जबडयाच्या विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यात येतात.
- मुखशल्यशास्त्र विभागाशी संबंधित सर्व प्रकारचे अद्ययावत उपचार करण्यात येतात.

ऑपरेशन थेटर

- या विभागात मोठी व लहान शस्त्रक्रियागृहे पूर्णपणे सुसज्ज आहेत.

वॉर्ड

- हया रुग्णालयात सुसज्ज असा आंतररुग्ण वॉर्ड आहे त्याची 25 बेडची क्षमता आहे.
- पुरुष व महिलांकरिता स्वतंत्र वॉर्ड आहे.
- 24 तास सेवेसाठी निवासी डॉक्टर्स तसेच कार्यक्षम डॉक्टरांचे पथक कार्यरत असते.

**<u>हिरडीरोग उपचार आणि कम्युनिटी डेंटिस्ट्री विभाग</u>**

कार्यकक्षा -

- सर्व ओरल प्रोफॅलॅक्सीस नुसार रुग्णांना उपचार केले जातात. जरुरीतेप्रमाणे रुग्णांवर स्केलींग आणि अल्ट्रासॉनीक स्केलींग पध्दतीने उपचार केले जातात.
- ऑक्लजल अडॅजस्टमेंट आणि मायनर सर्जिकल पध्दती उदस. क्युरिटेज जींजीव्हेक्टमी आणि ऑबसेसे ड्रेनेज चे उपचार चिकितसालयात केले जातात.
- डॉक्टर, कर्मचारी वृंद तसेच पदव्युत्तर विद्यार्थी उपचारासाठी नवीन पध्दतीचा वापर करतात आणि उदा. प्लॅप सर्जरीज आणि रीजनरेटीव्ह प्लॅप सर्जरी उपचार करतात.

**<u>सामाजिक दंत चिकित्सा (कम्युनिटी डेंटिस्ट्री)</u>**

कार्यकक्षा -

- या विभागाकडून दरवर्षी सुमारे 25 ते 30 डेन्टल कॅम्पस (दंत शिबिरे) आयोजित केले जातात.
- दात तपासणे आणि काढणे, ओरल फिजीओथेरपीच्या सूचना आणि रुग्णांना माहिती देणे इत्यादी कामे दंत शिबिरात करण्यात येतात.

विभागात स्पेशल इक्यूपमेंट

- टेम्पो ट्रॅव्हलर्स मीनी बस बरोबर मोबाईल डेन्टल व्हॅन, डेन्टल चेअर्स आणि इन्स्ट्रमेंटस संच.

**<u>बालदंत उपचार विभाग</u>**

कार्यकक्षा -

- ज्या मुलांचे वय 12 पेक्षा कमी आहे त्यांचे हया विभागात उपचार केले जातात. दंत व वैद्यकिय तपासणी केली जाते.
- पीट व फीशुअर सिलेंटस आणि रेस्टोरेशन्स हे उपचार कायम व प्राथमिक दातांवर केले जातात.
- दांत काढणे, स्केलिंग, लहान सर्जरी, रिप्लॅटेशन, फॅब्रीकेशन ऑफ डेंचर केले जातात.
- पल्पोटोमी, पल्पेपॅटॉमी, ओरज प्रोफॉलेस नियमिज केले जातात. स्टेनलेस स्टील क्रॉऊन फीडींग प्लेट, स्पेस मॅटेनर आणि हॅबीट ब्रेकिंग अप्लायसेंस केली जातात.
- करेक्शन ऑफ क्रॉस बाईट आणि बायॅप्सी हे आधुनिक उपचार केले जातात.

**<u>दांत काढण्याचा व वाचविण्याचा विभाग</u>**

कार्यकक्षा -

- या विभागात दातांमध्ये चांदी भरणे, जीआयसी, कंपोझिट फिलींग इन्ले/ऑन्ले आणि फुल क्रॉऊन असे उपचार करण्यात येतात.
- रुट कॅनाल उपचार करण्यात येतात.
- विविध प्रकारच्या इंडो-सर्जरी या विभागात करण्यात येते.
- इंडोडॉन्टिक्स या शाखेतील विविध अत्याधुनिक उपचार ही या विभागात करण्यात येतात.

**<u>दंत व्यंगोपचार शास्त्र विभाग</u>**

कार्यकक्षा -

- या विभागात वेडयावाकडया दांतावर उपचार करुन ते सामान्य स्थितीत आणले जातात.
- दातांना तार बसविणे, ओठाची चीर यासाठी प्लेट देणे वगैरे उपचार करण्यात येतात.
- दंत व्यंगाबाबतचे सर्व प्रकारचे उपचार या विभागात अद्ययावत यंत्रसामुग्री वापरुन करण्यात येतात.

**<u>कृत्रिम दंत शास्त्र विभाग</u>**

कार्यकक्षा -

- दातांची पूर्ण कवळी तसेच काढता येण्याजोगी अर्ध दंत कवळी इत्यादी कामे नियमित करण्यात येतात.
- विविध प्रकारच्या कायमच्या (फिक्सड) अर्ध दंत कवळया, पूर्ण मेटल अक्रॅलिक/सिरॅमिक फेसिंग, सिरॅमिक पूर्ण दंत कवळी वगैरे कामे केली जातात.
- अध्यापक आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मुखशल्यशास्त्र विभागाच्या आवश्यकतेनुसार कृत्रिम दंत शास्त्राशी संबंधित विविध उपचार करतात.

**<u>मुखरोगनिदान आणि सुक्ष्मजीवशास्त्र विभाग</u>**

- सर्व प्रकारचे मुखरोग निदान या विभागात करण्यात येते.
- या विभागातील प्रयोगशाळेत मुखरोगाशी संबंधित विविध चाचण्या करण्यात येतात. तसेच रक्ताच्या नेहमीच्या चाचण्या करण्यात येतात.

**<u>ग्रंथालय</u>**

कार्यकक्षा -

- या महाविद्यालयात अद्ययावत व सुसज्ज ग्रंथालय आहे.
- ग्रंथालयाची क्षमता 100 विद्यार्थी बसू शकतील इतकी आहे.
- ग्रंथालयात 10000 हून अधिक पुस्तके आहेत.
- ग्रंथालयात 3000 जर्नल्स तसेच विद्यार्थी व शिक्षकासाठी ऑडिओ/व्हिडिओ मडियाची व्यवस्था आहे.